दैनिक साम्ययोग-

# विनोबा-वार्ता

मासिक वर्गणी १.५० न. पै.

अंक : ९५ ) वर्धा, सोमवार ता. ६ जुलई १९६४ (मूल्य ५ न.पै.

# अनिकेत

## विनोबांची महिलाश्रमला अवचित भेट



### नालवाडीच्या बुद्ध मंदिराचे दर्शन घेतले.

कवि म्हणतो, "जो सोवत है सो खोवत है". गोपुरीवासीयांची स्थिति आज (३ जुलै-शुक्रवार) अशीच झाली. पहाटे साडेतीन वाजतां सारी गोपुरी निद्रा देवीच्या आधीन होती. आणि त्यावेळी विनोबा आपल्या दोन सेवकांचे हात धरून गोपुरीच्या रस्त्यानें महिलाश्रमाकडे चालले होते.

पहाटे म्हणा की रात्री म्हणा, २ वाजून दहा मिनिटांनी बाबांनी आपल्या जय-विजयना सांगितले कीं अडीच वाजतां महिलाश्रमला जायला निघूं. बिचारे सेवक. अंथरुणें आवरून, जरूरी वस्तु बरोबर घेई पर्यंत अडीच वाजले. अडीच वाजतां यात्रा सुरु झाली.

रस्ता पूर्ण शांत होता. चिटपाखरुहि नव्हतें त्या नागपूर-वर्धा रोडवर. नुकताच पाऊस पडून गेला होता. आकाश स्वच्छ होते. हवेत आल्हाददायक थंडावा होता. पावणेदोन घंट्यात महिलाश्रम गाठले.

बिचारे महिलाश्रम, त्यांना काय माहीत की आज सकाळी डोळे उघल्याबरोबर साधुसंताचे दर्शन होणार आहे म्हणून. महिलाश्रमचे निवासीपण साखरझोपेत होते. बाबा गेले ते थेट आपल्या आवडत्या गच्चीवर. १९२३ ते ३१ पर्यंत सतत नऊ वर्षे ह्याच ठिकाणी कर्म साधना झाली होती. त्या शांतवेळी त्या गच्चीवर मग भजनांची धून लागली. गायक होते बाबा व श्रोताहि होते बाबा. दोघे सेवक कामात गुंतले होते. नास्त्याची व्यवस्था करायची होती. तोंड धुण्याचीहि व्यवस्था करायची होती.

आतापर्यंत ही बातमी महिलाश्रमाच्या घरकुलातून जाऊन पोचली होती. हळूहळू मंडळी जमू लागली. प्रार्थनेची वेळ होत आली होती. प्रार्थना झाली· गोष्टी बाता झाल्या. आणि बाबा परत निघाले.

नास्ता अजून व्हायचा होता.
"नास्ता घेणार नं ?"

"इथे नाही."

आणि यात्रा सुरु झाली.

आतां सहा वाजले होते. गोपुरी अजूनहि पूर्ण जागृत झाली नव्हती. कांही जागे होते त्यांनी बाबांना पाहिले. पण बाकी 'जो सोवत है सो खोवत है। जे जागे होते त्यांनाहि अुडत अुडतच दर्शन झाले. कारण गोपुरीतून बाबा पळतच गेले. गोपुरी ओलांडल्यानंतर म्हणाले. कुणाला कळले नाही न ?'

'नास्ता घेणार का ?' रस्त्यांत परत विचारले. "आपल्या घरी घेऊ." पवनार अजून चार मैल दूर होते. म्हणून परत प्रश्न केला, "तेथे पोहचल्यावर घ्यायचे म्हणजे फार उशीर होईल."

तूं घर म्हणजे कोणचे घर समजलास ?"

"पवनार"

"नाही. नालवाडी."

नालवाडीला बाबा पांच वर्षे होते. जेथे त्यांची छोटीशीं झोपडी होती तेथे आतां अेक मोटा चबुतरा आहे. तेथें बसून बाबांनी दही घेतले. दही महिलाश्रमातून आणले होते. अेका घरांतून दही, अेका घरांतून मधु, अेका घरातून वाटी अशा वस्तु गोळा करण्यात आल्या होत्या. नेहमीचा ठराविक सेट सेवकाजवळ नव्हता, कारण 'विदाअूट नोटिस' पूर्व-सूचनेशिवाय यात्रा सुरू झाली होती.

नास्ता खाणे झाल्यावर बुद्ध-मंदिरांत बुद्ध दर्शन घेतले. बुद्ध मंदिरात अेक चित्र होते, वाघ पाणी पीत आहे. त्या चित्राकडे पाहून बाबा म्हणतात "दुसऱ्या बाजूला गाईचे असेच चित्र हवे" व वर मग लिहुन ठेवायला हवे जे ज्ञानदेवांनी म्हटले आहे.

"गाईची तृषा हरू, की व्याघ्रा विष होऊनी मारू अैसे नेणेंचि गा करू, तोय जैसे". नालवाडीच्या लोकाबरोबर गोष्टी झाल्या. आणि मग यात्रा पवनारच्या मार्गाला लागली.

'आज आमच्या घरी आम्ही नास्ता केला'

'हो'

अेका घरांत जाअून बसलो. प्रार्थना केली. दुसऱ्या घरांत नास्ता केला. आमची पुष्कळ घरे आहेत. ह्या इथे पांच घरे आहेत. १९२१ पासून अेक दीड वर्षे मगनवाडी नंतर बजाजवाडी त्यानंतर कॉटन मार्केट नंतर महिलाश्रम. तेथे दहा वर्षे राहिलो. त्यानंतर. चार वर्षे नालवाडी व नंतर पवनार. जो अनिकेत है अुसको घर की क्या कमी है ? सारी दुनिया ही अुसका घर है।

—कालिंदी

---o---

